# मुंबई विद्यापीठ

## दूर व मुक्त अध्ययन संस्था ( आयडॉल )

प्रसिद्धीपत्रक दिनांक : ६ ऑक्टोबर २०२०

### सर्व्हरवर सायबर अटॅकमुळे आयडॉलचे आज व उद्याचे पेपर पुढे ढकलले.

मुंबई - मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या तृतीय वर्ष बीकॉम व बीएच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षेच्या सर्व्हरवर सायबर अटॅकने तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने आज दि. ६ ऑक्टोबर २०२० रोजी व उद्या दि. ७ ऑक्टोबर २०२० होणारे परीक्षेचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. या परीक्षेच्या तारखा लवकरच ठरवून त्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व आयडॉलच्या लिंकवर प्रदर्शित केल्या जाणार आहेत.

ऑनलाईन परीक्षेच्या सर्व्हरवर सायबर अटॅक आढळला आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ तक्रार नोंदविणार आहे. यामुळे या परीक्षांमध्ये हि तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे.

दि. ३ ऑक्टोबर २०२० पासून दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या अंतिम वर्षाच्या तृतीय वर्ष बीकॉम व बीएच्या परीक्षेस सुरुवात झाली. आज या परीक्षेचा दुसरा पेपर होता. तांत्रिक अडचणीमुळे आजचे हे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. तसेच उद्या दि. ७ ऑक्टोबर २०२० रोजी होणाऱ्या परीक्षा तृतीय वर्ष बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स, तृतीय वर्ष बीएस्सी आयटी सत्र ६ व बॅकलॉगच्या परीक्षा प्रथम व द्वितीय वर्ष बीए व बीकॉम, एमसीए सत्र १ व सत्र २ या परीक्षाचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. दिनांक ६ व ७ ऑक्टोबर २०२० रोजीच्या या परीक्षांच्या नवीन तारखा लवकरच जाहीर केल्या जातील.

उपकुलसचिव - जनसंपर्क